# बृहन्मुंबई महानगरपालिका

नायर रुग्णालय दंत महाविद्यालय, डॉ. ए.एल.नायर रोड, मुंबई – 400 008.

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005

# नियम पुस्तिका क्र.1 ते 18

# नायर रुग्णालय दंत महाविद्यालय, डॉ. ए.एल.नायर रोड, मुंबई – 400 008.

# केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005

**<u>नियमावली क्र. 01</u>**

**<u>प्रस्तावना:-</u>**

नायर रुग्णालय दंत महाविद्यालय हे मुंबई शहराच्या मध्यभागी वसलेली देशातील एक अग्रगण्य व अद्ययावत अशी स्वतंत्र दंत संकूल आहे.

नायर रुग्णालय दंत महाविद्यालयाच्या इतिहास ब्रिटीश काळापासून असून सन 1933 मध्ये ततकलिन अधिष्ठाता स्व. डॉ.व्ही.एस.देसाई यांनी राष्ट्रीय दंत संस्थेची संकल्पना मांडली आणि डॉ.ए.एल.नायर व डॉ.एम.वेंकटराव या पदोगामी संस्थापक यांचया मदतीने भारताच्या गरीब वर्गाला दंत उपचार मिळावेत म्हणून सुरुवातीला छोटेसे दंत रुग्णालय सुरु केले.

हया दंत महाविद्यालयाची प्रथमत: केवळ 6 दंत खुर्च्यासह सुरुवात झाली. त्यासाइी स्वतंत्र इमारत नव्हती म्हणून टोपीवाला राष्टीय वैद्यकिय महाविद्यालयात एका छोटयाश्या खोलीत ते सुरु करण्यात आले.

1946 – यन 1946 मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेलने वैद्यकिय महाविद्यालयांची सुरुवात केली. 5 मजल्याची स्वतंत्र इमारत उभारण्यात येऊन त्यात दि. 1 नोव्हेंबर 1946 पासून नायर रुग्णालय दंत महाविद्यालय सुरु करण्यात आले. त्यानंतर सदर महाविद्यालयात आता 76 दंत खुर्च्या, 52 दंत युनिट, 4 अद्ययावत प्रयोगशाळा आणि इतर दंत सामग्री उपलब्ध आहे.

1951 – डॉ. एम.वेंकटराव यांनी हया संस्थेस भूखंड दिला.

1954 – सन 1954 मध्ये हे महाविद्यालय मुंबई विद्यापीठास संलग्न झाले.

1956 – भारत सरकारच्या योजनेप्रमाणे आणि महानगरपालिकेने मान्यता दिल्याप्रमाणे हया महाविद्यालयात एकूण चार विषयांत पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यात आले.

1972 – सन 1972 मध्ये डॉ.एम. वेंकटराव यांनी देणगीदाखल दिलेल्या भूखंडावर पाच मजल्यांची एक स्वतंत्र इमारत बांधण्यात आली.

सध्या नायर रुग्णालय दंत महाविद्यालय ही आठ मजल्यांची एक इमारत असून त्यात 154 दंत खुर्च्या आणि युनिटस असून वार्षिक अंदाजे 347223 रुग्णांना दंत सेवा पुरविण्याची महत्वाची कामगिरी करण्यात येत आहे. हया महाविद्यालयात एकूण 385 विद्यार्थी पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम घेत असून वेगवेगळया आठ विषयांत एम.डी.एस एस. पदव्युत्तर अभ्यासक्रम ही शिकविण्यात येतो.